बीओ पाढो

# २ लाहंतराए निद्धणस्स कहा

विसाव्या शतकात, प्राकृत विद्येच्या प्रसारासाठी ज्या मुनिवर्यांनी आपले साहित्यिक योगदान दिले-अशा अभ्यासकांमध्ये आचार्य विजयकस्तूरसूरींचे नाव प्रामुख्याने घ्यावे लागते. 'पाइअ-विन्नाण-कहा' (भाग १, २) या कथाग्रंथांमधून त्यांनी अभिजात प्राकृतात असलेल्या अनेक जैन कथा, सुलभ जैन महाराष्ट्रीत आणल्या. 'पाइअ-विन्नाण-कहा'-भाग १ मधून येथे घेतलेली ही कथा 'लाभान्तराय-कर्मा'चे स्वरूप विशद करते.

ज्याला आपण व्यवहारात 'दुर्दैव', 'दुर्भाग्य'- असे म्हणतो, तो जैन संकल्पनेप्रमाणे मोहनीय आणि अंतराय कर्मांचाच परिपाक असतो. अगदी समोर ठेवलेले मौल्यवान रत्न एका दुर्दैवी निर्धनाला कसे प्राप्त होत नाही- याविषयीची ही मनोरंजक कथा !



कम्मि गामे एगो निद्धणो निब्भग्गो पुरिसो आसी । सो कट्ठेण जीवणं निव्वहेइ । एगया सो वणम्मि गओ, तत्थ एगो विज्जाहरो विज्जाहरी अ विमाणेण गच्छंति । तेहिं दंपईहिं सो निद्धणो दिट्ठो । विज्जाहरी तं नियभत्तारं कहेइ - 'हे पिय ! एसो निद्धणो अम्हाणं दिट्ठिपहम्मि समागओ तया एसो अवस्सं सुहं पावियव्वो।' विज्जाहरो कहेइ - 'एसो निद्धणा निब्भग्गो अत्थि । दिण्णधणो वि असुहकम्मोदएण सो निद्धणो चिअ होज्जा ।'

विज्जाहरी कहेइ - 'पिय ! तुमं किवणो आसि, तेण एवं कहेसि।' विज्जाहरो कहेइ- 'हं सच्चं वएमि । हे पिए ! तुम्ह वीसासो न होज्जा, तया एयस्स परिक्खं कुणेमो । जम्मि पहे एसो गच्छइ, तयग्गओ किंचि वि दूरे पहम्मि कोडिमुल्लं एगं कुंडलं ठविस्सामि । जइ सो तं गिण्हेज्जा तया तस्स इमं कुंडलं ।' एवं कहिऊण तेण विज्जाहरेण तस्स निद्धणस्स नाइदूरे नच्चासण्णे तं कुंडलं मग्गे ठवियं ।

गच्छंतस्स तस्स तं कुंडलं जया समीवमागयं, तया सो लाहंतराय-कम्मस्स उदएण एवं चिंतेइ - 'अंधो कहं चलेज्जा ?' एवं चिंतित्ता सो अंधस्स इव नेत्ते निमीलिऊण, मग्गे ताव चलिओ, जाव तं कुंडलं पच्छा ठियं । तेण सम्मुहत्थं पि कुंडलं कम्मवसेण न पावियं । तं च कुंडलं विज्जाहरेण गहियं । एवं भाग्गहीणा पुरिसो सम्मुहत्थं पि दव्वं न पासइ् ।

## शब्दार्थ व टीपा

**लाहंतराए निद्धणस्स कहा** – लाभांतरायाविषयी निर्धन व्यक्तीची कथा.
**निब्भग्गो** (वि.) (पुं.) – दुर्भागी, दुर्दैवी.
**कट्ठेण** (क्रि. वि.) – कष्टाने, कसेबसे.
**दंपई** (पुं.) – दंपती, पति-पत्नी.
**नियभत्तारं** – स्वतःच्या पतीला.
**दिण्णधणो** (समास) – दिण्णं धणं जस्स सो । (बहुव्रीहि) दिले आहे धन ज्याला असा तो.
**असुहकम्मोदओ** (समास) – असुहस्स कम्मस्स उदओ । (षष्ठी तत्पुरुष) अशुभ कर्माचा उदय.
**किवण** (वि.) (पुं.) – कृपण, कंजूष.
**वएमि** (क्रि.) – 'वय', वर्तमानकाळ, प्रथम पुरुष एकवचन, बोलत आहे.
**विसासो** (पुं.) – विश्वास.
**तयग्गओ** – त्याच्या पुढे.
**नाइदूरे नच्चासण्णे** – फार दूर नाही आणि फार जवळही नाही.
**समीवमागयं** (संधि) – समीवं+आगयं । जवळ आले.
**नेत्ते निमीलिऊण** – डोळे मिटून.
**सम्मुहत्थं** (वि.) (नपुं.) – समोर असलेले.

## स्वाध्याय

**प्र. १ : पाइयभासाए उत्तराणि लिहह ।**
(१) विज्जाहरो निद्धणस्स पुरओ किं ठवेइ ?
(२) जया कुंडलं समीवं आगयं तया निद्धणो किं चिंतेइ ?

**प्र. २ : थोडक्यात उत्तरे लिहा.**
(१) निर्धनाला बघून विद्याधरीने विद्याधराला काय सांगितले ? विद्याधराने त्यावर कोणते उत्तर दिले ?
(२) समोर ठेवलेले रत्न, दुर्भागी निर्धनाने कसे घालविले ?

**प्र. ३ : व्याकरण**

**अ) कंसातील क्रियापदांची योग्य रूपे घालून वाक्य पूर्ण करा.**
(१) सो कट्ठेण जीवणं (निव्वह) ।
(२) अहं सच्चं (वय) ।
(३) एवं (कह) तेण विज्जाहरेण तं कुंडलं मग्गे ठवियं ।
(४) तं च कुंडलं विज्जाहरेण (गह) ।
(५) भग्गहीणा पुरिसा सम्मुहत्थं पि दव्वं न (पास) ।

**ब) पुढील प्राकृत शब्दांना समानार्थी प्राकृत शब्द द्या.**
अरण्ण, दरिद्द, भग्गहीण, बोल्ल, नेत्तहीण

## विशेष अभ्यास

शिक्षकांच्या मदतीने अंतरायकर्माच्या पाच प्रकारांचे स्वरूप सोदाहरण समजून घ्या.

❑ ❑ ❑